## तहसिलदारांचे अधिकार (म.ज.म.अ. १९६६ अन्वये)

| कायदा | कलम | विवरण | कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ | ७(४) | जिल्ह्यातील महसूल अधिकारी | तहसिलदारांना कोतवाल नेमणूकीचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १७(१) | पैसा, कागदपत्रे किंवा इतर मागण्या संबंधित व्यक्तींना लेखी कळविणे | खात्यात किंवा जिल्ह्यात, पूर्वी नोकरीस असलेल्या महसूल अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे, सरकारी पैशासंबंधी किंवा कागदपत्रासंबंधी किंवा राज्य शासनाच्या इतर मालमत्तेसंबंधी त्यास मागणी करावयाची असेल, तेव्हा अशा सर्व बाबतीत, आपल्या सहीने व जर तो मुद्रा वापरीत असेल तर, त्या मुद्रेनिशी लेखी मागणी करून असा पैसा, किंवा अटकावून ठेवलेली कागदपत्रे किंवा मालमत्ता उक्त लिखाण घेऊन येणाऱ्या व्यक्तीस ताबडतोब देण्यास किंवा उक्त लिखाणात निर्दिष्ट करण्यात येईल अशा व्यक्तीस, अशा तारखेस आणि अशा ठिकाणी देण्यास तहसिलदार फर्मावू शकेल. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १८ | सरकारी पैसा, आणि कागदपत्रे किंवा मालमत्ता महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल. | खात्यात किंवा जिल्ह्यात, पूर्वी नोकरीस असलेल्या महसूल अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे, सरकारी पैशासंबंधी किंवा कागदपत्रासंबंधी किंवा राज्य शासनाच्या इतर मालमत्तेसंबंधीची मागणी, तहसिलदारला महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | २५(२) | धारण जमिनीतील झाडांवरील हक्क | भोगवटादाराच्या धारण जमिनीतील झाडासंबंधी हक्काची किंमत विहित करण्यात येईल अशा रितीने ठरविणे. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ३० | अधिनियमातील उपबंधानुसार मंजूर करण्यात आलेल्या जमिनीचा भोगवटा करण्यास फर्मावणे. | जी कोणतीही जमीन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये कोणत्याही व्यक्तीस मंजूर करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीस मंजुरीच्या अटींनुसार अशा जमिनाचा भोगवटा करण्यास विनाविलंब फर्मावणे हे तहसीलदाराचे कर्तव्य असेल. | मूळ अधिकार |
| --- " --- | ३१ | भोगवट्यात नसलेली जमीन शर्तीवर देता येईल | शासनाच्या/ जिल्हाधिकारीच्या आदेश/ नियमांना अधीन राहून, कलम ३० अन्वये जमिनीवर प्रवेश करण्यात येण्यापूर्वी बिनदुमाला जमिनीची किंमत देण्यास फर्माविणे किंवा ती लिलावाने विकणे आणि ती देण्याबाबत अशा नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्ती जोडणे हे तहसिलदारने करणे कायदेशीर असेल. | प्रदान केलेला अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| --- " --- | ३५ | सोडून दिलेल्या किंवा जप्त केलेल्या पोट-विभागाचा विनियोग | जर भू-मापन क्रमांकाचा कोणताही पोट-विभाग कलम ५५ अन्वये सोडून देण्यात आला असेल तर असा पोट-विभाग, सरकारी पडीत जमीन आहे असे समजून तहसिलदार जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये त्याचा विनियोग करील. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ४८(२) | खाणी व खनिजे यांवरील शासनाचा हक्क | अनधिकृत गौण खनिज जप्त करण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ४९ | इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून पाण्याचे पाट बांधणे | पाण्याच्या एखाद्या साधनातून (ज्यामधून पाणी घेण्यास परवानगी देण्यात आली आहे असे शासनाच्या मालकीचे असलेले कोणतेही पाण्याचे साधन धरून) पाणी घेण्याचा ज्यास हक्क आहे अशा कोणत्याही व्यक्तीने उक्त साधनातून शेतीच्या कारणाकरिता, आपल्या जमिनीस पाणीपुरवठा करण्यासाठी, पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असेल, परंतु  असा पाण्याचा पाट दुसऱ्या व्यक्तीच्या मालकीच्या किंवा कब्जात असलेल्या जमिनीमधून बांधावयाचा असेल आणि अशा बांधकामाबद्दल उभयतांत कोणताही करार झाला नसेल तर पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने विहित केलेल्या नमुन्यात तहसीलदाराकडे अर्ज केल्यास चौकशीअंती परवानगी देता येईल. | मूळ अधिकार |
| --- " --- | ५० | अतिक्रमणे दूर करणे | शासनाकडे निहित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ५२ | किंमत व जमीन महसूल कसा मोजावा | अतिक्रमण केलेल्या जमिनीच्या बाबतीत द्यावयाची जमिनीची किंमत आणि जमीन महसुलाची किंवा आकारणीची रक्कम ठरविणे. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ५३ | अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या व्यक्तीचे निष्कासन | शासनाकडे निहित असलेल्या जमिनींचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून निष्कासित करण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ५४ | निष्कासित केल्यानंतर उरलेली मालमत्ता सरकारजमा करणे | कलम ५३ अन्वये संक्षिप्त चौकशी करून कोणत्याही व्यक्तीस काढून टाकल्यानंतर अशा जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकामे, किंवा उक्त जमिनीत काढलेले कोणतेही पीक, वाजवी वाटेल अशा लेखी नोटिसीनंतर अशा व्यक्तीने काढून नेले नसेल तर, ते सरकारजमा केले जाण्यास किंवा संक्षिप्त रीतीने चौकशी करून काढून टाकणे. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ५५ | जमीन सोडून देणे | शासन किंवा भोगवटादार यांच्याखेरीज ज्या व्यक्तीच्या नावे कायदेशिररीत्या जे कोणतेही हक्क, धारणाधिकार, | मूळ अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | भार किंवा समन्याय अस्तित्वात असतील त्यांना अधीन राहून, भोगवटादारास कृषी वर्षाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कमीत कमी तीस दिवस आधी तहसीलदारास लेखी नोटीस देऊन त्याला ती जमीन सोडून देता येईल म्हणजेच ती राज्य शासनाच्या नावे करून देता येईल व त्यानंतर अशा दिनांकानंतर येणाऱ्या कृषी वर्षापासून तो भोगवटादार राहणार नाही. अशी जमिनीचा स्विकार तहसिलदारांनी करावा. | |
| --- " --- | ५९ | अनधिकृत भोगवटादारास काढून टाकण्याचा अधिकार | अनधिकृतपणे जमिनीचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ६१(ब) | वहिवाट ही दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस केव्हा पात्र नसेल, न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अंमलात आणणे | कोणतीही वहिवाट जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून हस्तांतरणयोग्य असणार नाही आणि अशी मंजुरी देण्यात आलेली नाही अशा अर्थाचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ७४ | भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून भोगवटादाराखेरीज इतर विवक्षित व्यक्तीने जमीन महसूल देणे | भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून भोगवटादाराखेरीज इतर विवक्षित व्यक्तीने दिलेला जमीन महसूल स्वीकारणे | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ७७ | पावत्या देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती | कोणत्याही व्यक्तीने कलम ७६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पावती देण्यात कसूर केला तर ती व्यक्ती, रक्कम देणाऱ्या व्यक्तीने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे, भरलेल्या रकमेच्या दुप्पटीपेक्षा अधिक नसेल इतकी शास्ती करण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | ८५ | विभाजन | दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यावरून किंवा सहधारकांनी अर्ज केल्यानंतर धारण जमिनीचे विभाजन करण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १३६ | भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या हद्दींची आखणी | हितसंबंध असलेल्या एखाद्या पक्षकाराने अर्ज केल्यावर, एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागांच्या हद्दींची आखणी करण्याचा व त्यावर हद्दींच्या निशाण्या उभारण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १३९ | भू-मापन क्रमांक आणि गावे इत्यादींच्या हद्दींची निशाणी लावणे व ती दुरुस्त करणे | ज्याला भूमि अभिलेख अधीक्षकाने किंवा जमाबंदी अधिकाऱ्याने प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही भू-मापन अधिकाऱ्याने गावांच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोटविभागांच्या हद्दीच्या निशाण्या विनिर्दिष्ट केल्यावर किंवा त्यांची | प्रदान केलेला अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दुरुस्ती केल्यावर त्याचा सर्व खर्च जमीन धारण करणाऱ्यांवर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींवर आकारण्याचा अधिकार. | |
| --- " --- | १४३ | भू-मापन क्रमांकाच्या हद्दीवरून रस्ता देणे | एखाद्या भू-मापन क्रमांकात जमीन धारण करणाऱ्या व्यक्ती, इतर भू-मापन क्रमांकाच्या हद्दीवरून रस्त्याबाबतच्या हक्काची मागणी करीत असतील तर तहसीलदारास त्याची चौकशी करून निर्णय करता येईल. | मूळ अधिकार |
| --- " --- | १४५ | हद्दीच्या निशाणीचे नुकसान केल्याबद्दल शास्ती | संक्षिप्त चौकशीत ज्या कोणत्याही व्यक्तीने हद्दीची निशाणी किंवा भू-मापन चिन्ह जाणूनबुजून काढल्याचे किंवा त्याला नुकसान पोहोचविल्याचे सिध्द झाले असेल, अशी व्यक्ती अशा रीतीने नाहीशी केलेल्या, काढून टाकलेल्या किंवा नुकसान पोहचविलेल्या प्रत्येक निशाणीदाखल शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल. | मूळ अधिकार |
| --- " --- | १५० | फेरफार नोंदवही | जेथे साठवणुकीच्या यंत्राचा (संगणक इत्यादी) वापर करुन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम १४८ क अन्वये अधिकार अभिलेख ठेवण्यात आलेले असतील, तेथे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम १५४ अन्वये सुचना मिळाल्यानंतर, लगेचच, ती सूचना, फेरफारामध्ये ज्याचा हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन किंवा फेरफार नोंदवहीवरुन त्यास दिसून येईल, अशा सर्व व्यक्तींना आणि त्यात ज्या व्यक्तींचा हितसंबंध आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीला व त्याबरोबर गावाच्या संबंधित तलाठयास लघुसंदेश सेवा (एस.एम.एस.) किंवा इलेक्ट्रॉनिक मेल (इ-मेल) किंवा विहीत करण्यात येईल अशा इतर कोणत्याही उपकरणाद्वारे पाठविणे. | मूळ अधिकार |
| --- " --- | १५२ | माहिती देण्यात हयगय केल्याबद्दल दंड | जी कोणतीही व्यक्ती, विहित केलेल्या मुदतीत, कलम १४९ अन्वये आवश्यक असलेले प्रतिवृत्त देण्यात किंवा कलम १५१ अन्वये आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात किंवा दस्तऐवज सादर करण्यात हयगय करील अशा व्यक्तीला दंड करण्याचा व ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १५५ | लेखन-प्रमादांची दुरुस्ती | कोणतेही लेखन प्रमाद किंवा अधिकार अभिलेखात ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत ज्या चुका झाल्या असल्याचे हितसंबंधित पक्षकारांनी कबूल केले असेल किंवा ज्या चुका तो निरीक्षण करीत असताना | प्रदान केलेला अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आढळतील अशा कोणत्याही चुका कोणत्याही वेळी दुरुस्त करण्याचा किंवा दुरुस्त करवून घेण्याचा अधिकार. | |
| --- " --- | १७४ | जमीन महसूल भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती | विहित केलेल्या दिनांकानंतर एक महिन्याच्या आत, जमीन महसुलाचा कोणताही हप्ता किंवा त्याचा कोणताही भाग भरलेला नसेल तर हेतपुरस्सर कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत अशारीतीने न भरलेल्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नसेल इतकी शास्ती लादण्याचा अधिकार. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १७५ | प्रमाणित केलेले हिशेब हे थकबाकीविषयीचा पुरावा असणे | तहसीलदारने प्रमाणित केलेले लेख्याचे विवरणपत्र देय असलेल्या जमीन महसुलाच्या रकमेची थकबाकी असल्याबद्दलचा आणि ज्याने कसूर केली असेल अशा व्यक्तीसंबंधीचा निर्णायक पुरावा असेल. | मूळ अधिकार |
| --- " --- | १७६ | थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती | थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती ठरविण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १७९ | वहिवाटीबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनींबाबत थकबाकी येणे असेल त्या वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन जप्त करणे | ज्या वहिवाटीबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबाबत जमीन महसुलाची थकबाकी येणे असेल अशा वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा करणे आणि त्या वहिवाटींची किंवा जमिनीची कलम ७२ किंवा ७३ च्या तरतुदींन्वये विक्री करणे किंवा त्यांचा विनियोग करणेचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १८० | कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री करणे | कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री करणेचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १८१ | कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री | कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री करणेचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १८२ | कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थेखाली आणणे | कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थेखाली आणण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १९२ | विक्री करण्याच्या वेळेची कार्यपध्दती | सर्व अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | १९३ | विक्रीची अधिसूचना | सर्व अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | २१२ | विक्री कायम करण्यात आल्यावर खरेदीदीरास ताबा देणे, खरेदीचे प्रमाणन | कोणत्याही भोगवट्याच्या अधिकाराची किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीची कायम केल्यानंतर, त्याला खरेदीदार म्हणून जाहीर करणे, जमिनीचा | प्रदान केलेला अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ताबा देणे, कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या नावाऐवजी, खरेदीदाराचे नाव भोगवटादार किंवा जमिनधारक म्हणून भूमि-अभिलेखात दाखल करणे, त्याने जमीन खरेदी केली आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र देणेचा अधिकार | |
| --- " --- | २१८ | जप्त केलेल्या मालमत्तेवर केलेले दावे निकालात काढणे | फक्त जप्त केलेल्या जंगम मालमत्तेवर केलेले दावे निकालात काढण्याचा अधिकार | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | २२६ | दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अधिकार | तहसीलदार यास, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, आपल्या स्वत:च्या फाईलवरून काढून त्या प्रकरणावर अथवा प्रकरणांच्या वर्गावर निर्णय देण्यास सक्षम असेल अशा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे निर्णयाकरिता पाठविता येईल किंवा अशा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यापासून कोणतेही प्रकरण अथवा प्रकरणांचा वर्ग काढून घेता येईल आणि ते स्वत: हाताळता येईल किंवा त्यांच्यावर निर्णय देण्यास सक्षम असलेल्या अन्य कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे असे प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, निर्णयाकरिता पाठविता येईल. | मूळ अधिकार |
| --- " --- | २४२ | बेकायदेशीररीत्या जमीन कब्जात ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निष्कासित करण्याची कार्यवाही | जेव्हा जेव्हा या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, अन्याय्य रीतीने जमीन कब्जात ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निष्कासित करणे. | प्रदान केलेला अधिकार |
| --- " --- | २५६ | आदेशांची अंमलबजावणी स्थगित करणे | तहसीलदाराने किंवा त्या पदावर येणाऱ्या उत्तराधिकाऱ्याने कोणताही आदेश दिला असेल, तो आदेश, अपिलासाठी विहित करण्यात आलेल्या मुदतीच्या आत कोणत्याही वेळी योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, अशा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करण्याबद्दल निर्देश देता येतील. | मूळ अधिकार |
| --- " --- | २५७ | हाताखालील अधिकाऱ्यांचे अभिलेख व कार्यवाही मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार | ज्या प्रकरणी रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करण्यात आली नाही अशा कोणत्याही प्रकरणामध्ये, तहसिलदारच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही मागविता येईल व तपासता येईल. | मूळ अधिकार |
| --- " --- | २५८ | आदेशांचे पुनर्विलोकन | तहसिलदार आपण होऊन किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून आपण दिलेल्या किंवा आपल्या कोणत्याही पूर्वाधिकाऱ्याने दिलेल्या | मूळ अधिकार |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करू शकेल आणि त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल. | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector